माहितीचा
अधिकार

दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/१००/२०१८
दि.०३/०८/२०१८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

...............अपिलार्थी
श्री.जितेंद्र अच्युत शेनॉय,
हरी निवास रुम नं.००१-०३,
मिरा गाव, मिरारोड (पूर्व).

...............प्रतिवाद
जनमाहिती अधिकारी तथा,
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.जितेंद्र अच्युत शेनॉय यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.१५/०६/२०१८ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) नगररचना विभागात शिपाई या पदावर कार्यरत असणारे अरविंद घरत यांचे नियुक्ती पत्र, शैक्षणीक पात्रता यासह अन्य सादर कागदपत्रांची छायांकित प्रत.
२) अरविंद घरत, नगररचना विभागात कधीपासून कार्यरत आहेत याची सविस्तर माहिती.
३) अरविंद घरत यांची या विभागातच कायम नियुक्ती करण्याबाबतचा खुलासा.
४) अरविंद घरत यांना याच विभागात बदली न करता कायम ठेवण्यासाठी आपल्या विभागाकडे सादर पत्रांची छायांकित प्रत.
५) अरविंद घरत यांची या विभागातून नियमित कालावधीनुसार बदली न करणाऱ्या आस्थापना विभागातील अधिकाऱ्यांविरुध्द केलेल्या अथवा करावयाच्या कार्यवाहीची माहिती.

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत योग्य माहिती न दिल्याने अपिलार्थी अर्जदार यांनी दि.१८/०७/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी अर्जदार व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.०३/०८/२०१८ रोजी दुपारी १२.०५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/३२८/२०१८ दि.३०/०७/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- मला दि.१५/०६/२०१८ रोजीच्या पत्रान्वये योग्य माहिती दिली नाही.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात आलेली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास माहिती दिलेली असुन अपिलार्थी अर्जदाराने मुद्दा क्र.२,३,४ व ५ ची माहिती अपुर्ण असल्याचे सुनावणी दरम्यान सांगितले आहे. सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत उपरोक्त मुद्यांची सुधारित मुद्देनिहाय माहिती विनाशुल्क स्वरुपात देण्यात यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ याच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.जितेंद्र अच्युत शेनॉय,
हरी निवास रुम नं.००१-०३,
मिरा गाव, मिरारोड (पूर्व).

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.